सुयोग शिक्षण प्रसारक मंडळ, गांधी नगर,पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ व्दारा संचलित स्व. बद्दूसिंग आडे, विजाभज प्राथमिक आश्रमशाळा, धुंदी, ता. पुसद, जि.यवतमाळ यांची दि. ०१/०६/२०१७ पासून मान्यता रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांकः याचिका-३९९६/२०१४/प्र.क्र.२३१/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
तारीख: १५ नोव्हेंबर, २०१७

वाचा

१. संचालक, विजाभज, इमाव,विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचे आदेश क्र. विजाभजसं/ आशा/ प्राआशाधुंदी/जि.यवतमाळ/मान्यता रद्द/२०१३-१४/३४० दि. २०/०५/२०१३

२. शासन आदेश क्र. अपिल/विभशा/२०१३/११३२/प्र.क्र.३१५/विजाभज-२,दि.३१/१२/२०१३

३.मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे रिट याचिका क्र. ३९९६/२०१४ मधील दि. ०८/०७/२०१५ चे आदेश.

४. शासन आदेश क्र. याचिका २०१५/प्र.क्र.२३१/विजाभज-२ दि. ०९/०६/२०१६.

प्रस्तावना

सुयोग शिक्षण प्रसारक मंडळ, गांधी नगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ व्दारा संचलित स्व. बद्दूसिंग आडे विजाभज प्राथमिक आश्रमशाळा, धुंदी, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे कार्यरत होती. सदर विजाभज आश्रमशाळेस शासन निर्णय दि. १६/१०/१९९२ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यास अनुसरुन विजाभजच्या मुलां-मुलींकरिता इयत्ता १ली ते ७वी चे वर्ग असलेली प्राथमिक आश्रमशाळा सुरु करण्यात आली. या आश्रमशाळेचे वेळोवेळी तपासणी क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी केली असता त्यामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटी व उणिवा आढळून आल्या. वारंवार सुचना देऊनही सदरहू आश्रमशाळेमध्ये कोणतीही सुधारणा निदर्शनास न आल्यामुळे सदर संस्थेस व आश्रमशाळेस संचालक, विजाभज, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस दिली होती. तथापि, पुरेशी संधी देऊनही सदर आश्रमशाळेमध्ये कोणतीही सुधारणा नसल्याने संचालक, विजाभज, पुणे यांनी दि. २०/०५/२०१३ च्या आदेशानुसार आश्रमशाळेचे मान्यता रद्द केली. सदर आदेशामध्ये संचालकांनी प्रामुख्याने पुढील त्रुटी व उणिवा आढळून आल्याचे नमूद केले आहे. निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांची अत्यंत कमी प्रमाणात उपस्थिती असणे, इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या वर्गांना स्वतंत्र वर्ग खोल्या आवश्यक असताना फक्त दोन खोल्यांमध्येच वर्ग भरविणे , वसतीगृहाच्या एकाच खोलीमध्ये मुलां-मुलींची राहण्याची स्वतंत्र व्यवस्था न करता एकत्रित व्यवस्था करणे, पुरेशी शौचालये व स्नानगृह उपलब्ध नसणे तसेच ती अस्वच्छ असणे, विद्यार्थ्यांना अंथरुण -पांघरुण, ताट-वाटी, तांब्या-पेला, गणवेश न पुरविणे , विद्यार्थ्यांसाठी महिनाभर पुरेल एवढा धान्यसाठा कोठीगृहात नसणे, पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरेशी नसणे , खोटे अभिलेख तयार करुन जास्त प्रमाणात विद्यार्थी असल्याचे दर्शविणे. आवश्यक असलेले अभिलेख तातडीने उपलब्ध न करुन देणे तसेच जे

अभिलेख उपलब्ध करुन दिलेत ते अद्यावत नसणे इत्यादी त्रुटी व उणिवांच्या आधारे संचालक, विजाभज, पुणे यांनी दि. २०/०५/२०१३ च्या आदेशान्वये शाळेची मान्यता रद्द केली होती. या आदेशाविरुध्द संस्था चालकांनी तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांच्याकडे अपिल दाखल केले असता याबाबत तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांनी दि. २२/१०/२०१३ रोजी सुनावणी घेउन त्यांनी दि. ३०/१२/२०१३ रोजी पारित केले. सदर आदेशान्वये त्यांनी संचालक, विजाभज, पुणे यांचे दि. २०/०५/२०१३ चे आश्रमशाळा मान्यता रद्द करण्याचे आदेश कायम केले आहेत. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांच्या दि. ३०/१२/२०१३ च्या आदेशाविरुध्द संस्थेने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र. ३९९६/२०१४ दाखल केली होती. या रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०८/०७/२०१५ रोजी आदेश पारित करुन रिट याचिका निकाली काढली आहे. मा. उच्च न्यायालयाने सदर आश्रमशाळेस त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी व त्यानंतर शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेशीत केले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय) यांनी दि. १०/०२/२०१६ रोजी सुनावणी घेऊन सदर संस्थेस त्यांची मान्यता रद्द करतेवेळी आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी देण्यात यावा असे आदेशित केले होते. त्यानुसार दि. ०९/०६/२०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये संस्थेस अवगत करण्यात आले. सदर आदेश संस्थेस प्राप्त होण्यापूर्वीच शाळा सुरु झाली असल्याने सदर संस्थेस पुरेशे विद्यार्थी मिळाले नाहीत असे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, अमरावती यांनी शासनास अवगत केले. सदर संस्थेचे सहायक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ यांनी दि. ०३/०७/२०१७ रोजी आश्रमशाळेची तपासणी केली असता सदर आश्रमशाळेत एकही विद्यार्थी आढळून आला नाही. त्यानंतर सहायक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ यांनी दि. १४/०८/२०१७ रोजी आश्रमशाळेची पुन्हा तपासणी केली असता एकही अनिवासी विद्यार्थी उपस्थित नव्हता व तीन निवासी विद्यार्थी उपस्थित होते. याशिवाय सदर आश्रमशाळेबाबत उपस्थित करण्यात आलेल्या इतर त्रुटींची पूर्तता करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता सदर आश्रमशाळेबाबत योग्य तो निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

सुयोग शिक्षण प्रसारक मंडळ, गांधी नगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ व्दारा संचलित स्व. बद्दूसिंग आडे विजाभज प्राथमिक आश्रमशाळा, धुंदी, ता. पुसद, जि. यवतमाळ या आश्रमशाळेमध्ये दिसून आलेल्या त्रुटी / उणिवांची पूर्तता करण्यासाठी संधी देण्यात येउनही त्यामध्ये सुधारणा झाली नाही. तसेच सहायक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ यांनी दि.०३/०७/२०१७ व दि. १४/०८/२०१७ रोजी आश्रमशाळेच्या केलेल्या तपासणीचा अहवाल लक्षात घेता सदर आश्रमशाळेत एकही अनिवासी विद्यार्थी आढळून न येणे तसेच तीन निवासी विद्यार्थी आढळून येणे, याशिवाय संचालक, विजाभज, इमाव,विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी दि. २०/०५/२०१३ रोजीच्या आदेशान्वये मान्यता रद्द करताना आढळून आलेल्या त्रुटी / उणिवांची पूर्तता न होणे या सर्व बाबीस संबंधित संस्थेचे संचालक तसेच आश्रमशाळांमध्ये कार्यरत असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर

कर्मचारी जबाबदार आहेत. आश्रमशाळेत विद्यार्थी नसताना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना विनाकाम वेतन देणे शासनास परवडणारे नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन सदर आश्रमशाळेची मान्यता दि. ०१/०६/२०१७ पासून रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

यास्तव, शासनाचा सदरील निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळवून सदर बाब मा.उच्च न्यायालयाच्या शपथपत्राव्दारे निदर्शनास आणूण द्यावी. तसेच सदरहू आश्रमशाळेबाबत विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांकडे हस्तांतर / स्थलांतराबाबत शासन निर्णय दि. १९/१२/२०१६ अन्वये संचालक, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुढील कार्यवाही तातडीने करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११६१५२३१४२४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.11.16 15:25:50 +05'30'

(भा. र. गावित)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२.मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
३.मा. मंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४.मा. राज्यमंत्री, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५.सचिव, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक.
६.संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७.धर्मदाय आयुक्त अमरावती विभाग, अमरावती.
८.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.
९.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग , अमरावती.
१०.सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ
११.अध्यक्ष / सचिव, सुयोग शिक्षण प्रसारक मंडळ, गांधी नगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ
१२.निवड नस्ती (विजाभज-२)